**दिनांक १ फेब्रुवारी, २०१६**

# हेमा मालिनी यांच्या ट्रस्टला भूखंड अद्याप मूल्यांकन झालेले नाही भूखंड नियमानुसारच प्रदान

**- एकनाथराव खडसे**

मुंबई, दि.१ फेब्रुवारी :- भाजपा खासदार हेमा मालिनी यांच्या ट्रस्टला देण्यात आलेली जमीन सर्व नियमांना व निकषांना अनुसरुनच देण्यात आली आहे. तसेच या भूखंडाचे अद्याप मूल्यांकन झालेले नाही. राज्य शासनाने हा भूखंड त्यांच्या संस्थेला मालकी हक्काने नव्हे (नव्हे), तर भाडेपट्टयाने (लीजने) दिलेला आहे. शासन या संस्थेला नाममात्र एक रुपये घेऊन सुध्दा असा भूखंड देऊ शकते. राज्य शासनाने यापूर्वी शिक्षण, रुग्णसेवा, महाविद्यालय, रुग्णालय इत्यादी सामाजिक कार्यासाठी अटींच्या अधीन राहून भूखंड दिलेले आहेत. हेमा मालिनी यांच्या ट्रस्टला सुध्दा नियमांच्या बाहेर जाऊन जमीन दिलेली नाही. ज्या कोणाला या प्रकरणात नियमबाह्यता दिसत असेल, तर अशा व्यक्ति वा संस्था अपील करु शकतात, असा खुलासा महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज पत्रकारांशी बोलतांना मुंबईत केला.

हेमा मालीनी यांच्या ट्रस्टला जे नियम व निकष यांच्या आधारे मुंबईत जमीन दिली आहे, तेच नियम व निकष यांच्या आधारे पूढील संस्थांना देखील राज्य शासनाने जमीन दिली आहे. (१) मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट – विलासराव देशमुख, (२) अर्थव कॉलेज, मालाड – गोपीनाथ मुंडे, (३) मालती वसंत हार्ट ट्रस्ट, अंधेरी (४) कासेगांव एज्युकेशन ट्रस्ट, वांद्रे - जयंतराव पाटील, (५) चेतना कॉलेज, वांद्रे (६) न्यू इंग्लिश स्कुल, वांद्रे, (७) रयत एज्युकेशन ट्रस्ट, बोरीवली, (८) इंदिरा गांधी एज्युकेशन ट्रस्ट, चेंबुर, (९) साने गुरुजी विद्या मंदीर, बोरिवली, (१०) समाजोन्नती एज्युकेशन ट्रस्ट, बोरिवली (११) गोखले एज्युकेशन ट्रस्ट, बोरिवली, (१२) स्वामी विवेकानंद

एज्युकेशन ट्रस्ट, दहिसर व चेंबुर, (१३) सिंधुदुर्ग एज्युकेशन ट्रस्ट – नारायण राणे, (१४) कोकण उन्नती मंडळ – बॅ.ए.आर.अंतुले, इत्यादी